# जेट प्रवाशांची परताव्यासाठी धावाधाव

## अन्य विमान सेवांचा प्रवासही महागला; मुंबई विमानतळावरील तिकीट खिडक्यांवर गर्दी

**प्रतिनिधी, मुंबई**

**जेट एअरवेजने** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सेवा रद्द केल्याने प्रवाशांची तिकीट परताव्यासाठी धावाधाव सुरू असून मुंबई विमानतळावरील जेटच्या तिकीट खिडक्यांवर परताव्यासाठी एकच गर्दी होऊ लागली आहे. मात्र परतावा मिळण्यासाठी पंधरा ते वीस दिवस लागतील, अशी माहिती कंपनीकडून प्रवाशांना दिली जात आहे. आयत्या वेळी अन्य विमान सेवांची तिकिटे आरक्षित करतानाही प्रवाशांना जादा रक्कम मोजावी लागत असल्याने एकच गोंधळ उडत आहे.

आर्थिक संकटात सापडलेल्या जेट एअरवेज कंपनीने गेल्या तीन महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचे वेतन दिलेले नाही. वेतनमुद्द्यावरून जेट कर्मचारी व व्यवस्थापनात खडाजंगी सुरू आहे. जेट कंपनीने तर गेल्या काही दिवसांत आपली राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यासही सुरुवात केली. लंडन, बेल्जियम, फ्रान्स, अमेरिका यासह अन्य सेवा जेटने रद्द केल्याने प्रवाशांना मोठा फटका बसला. एक ते दोन महिने आधी तिकीट आरक्षित करणाऱ्या प्रवाशांना कंपनीने अचानक मेल व मेसेज पाठवून सेवा रद्द केल्याचे सांगितले. त्यामुळे बाहेरगावी जाण्याचे नियोजन केलेल्या प्रवाशांना याचा धक्काच बसला आहे. त्यामुळे अन्य विमान कंपन्यांचे त्या मार्गावरील तिकीट आरक्षण केल्यास मोठी रक्कम प्रवाशांना मोजावी लागत आहे.

मुंबईत राहणारे दीपेश पटेल हे पत्नीसह २ मे रोजी अमेरिकेला जाणार होते. त्यासाठी त्यांनी जेट एअरवेजचे तिकीट काढले होते. परंतु १७ एप्रिल रोजी त्यांना सेवा रद्दच झाल्याचा मेल आला. परतावा मिळवण्यासाठी त्यांनी जेट तिकीट खिडक्यांकडे धाव घेतली. पटेल म्हणाले की, मे महिन्यात अमेरिकेला जाण्याचे नियोजन आधीच केले होते. परंतु सेवा रद्द झाल्याचा मेल आल्याने मोठी समस्या उभी राहिली आहे. तिकीट काढले तेव्हा प्रत्येकी ८० हजार रुपये किंमत होती. आता अन्य विमान सेवांची त्याच मार्गावरील तिकिटांची किंमत १ लाख ४० हजारापर्यंत पोहोचली आहे. परताव्यासाठी आलो तर पंधरा ते वीस दिवस लागतील, असे कंपनीने स्पष्ट केल्याचे ते म्हणाले.

मुलुंडला राहणारे महेंद्र गोलतकर यांनी ३१ मार्च रोजी जेटची दोन तिकिटे काढली होती. अचानक सेवा रद्द झाल्याचे सांगण्यात आल्याने त्यांनी परतावासाठी जेटच्या अंधेरीतील कार्यालयाकडे धाव घेतली. परंतु मुंबई विमानतळावर परतावा मिळणार असल्याचे त्यांना सांगण्यात आले. गोलतकर म्हणाले की, मी तिकीट काढणाऱ्या अधिकृत एजंटकडून तिकीट काढले होते. परंतु जेटकडून एजंटाना सेवा रद्द झाल्याच्या अधिकृत माहितीचा मेल न पाठवल्याने पैसे जेटच्या तिकीट खिडकीवरूनच मिळतील, असे एजंटने स्पष्ट केले. त्यामुळे परताव्यासाठी धावाधाव करत असल्याचे ते म्हणाले. जेटच्या हेल्पलाइनवरही मदतीसाठी फोन केल्यास त्यांच्याकडून अद्याप विविध योजनांची माहिती ऐकवली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

# १६ हजार कर्मचाऱ्यांवर टांगती तलवार

## १० मेपर्यंत हिस्सा विक्री प्रक्रियेकडे कर्मचाऱ्यांचे लक्ष

**प्रतिनिधी, मुंबई**

**काम नसले** तरी सेवा कायम राहील असे आश्वासन जेटच्या व्यवस्थापनाने गुरुवारी आपल्या कर्मचाऱ्यांना दिले असले तरी इथल्या १६ हजार कर्मचाऱ्यांचे भवितव्य १० मे नंतरच ठरणार आहे.

जेटच्या व्यवस्थापनाने बुधवारी रात्रीपासून आपली सेवा पूर्णपणे थांबविली. जेटने अनेक कर्मचाऱ्यांना गेले तीन महिने वेतन दिलेले नाही. काम नसले तरी नोकरी जाणार नाही, असे आश्वासन सध्या व्यवस्थापनाने कर्मचाऱ्यांना दिले आहे. १० मेपर्यंत जेट एअरवेज कंपनीतील हिस्सा विक्रीची प्रक्रिया संपवायची आहे. जी नवीन कंपनी जेट ताब्यात घेईल तिच्यावरच कर्मचाऱ्यांचे भवितव्य अवलंबून असेल. ऑल इंडिया जेट एअरवेज ऑफिसर व स्टाफ असोसिएशन व जेट व्यवस्थापन यांच्यात गुरुवारी जेटच्या मुंबईतील कार्यालयात झालेल्या बैठकीत ही बाब स्पष्ट झाली. या काळातील वेतनाची हमी देण्यास व्यवस्थापनाने नकार दिला.

गेल्या तीन महिन्यांपासून जेटच्या कर्मचाऱ्यांना वेतन मिळालेले नाही. त्यामुळे वैमानिकांसह अन्य कर्मचाऱ्यांनी १ एप्रिल रोजी संपाची हाक दिली होती. मात्र जेट व्यवस्थापन व कंपनीचा हिस्सा असणाऱ्या स्टेट बँकेकडून काहीतरी तोडगा निघेल या आशेने संप पुढे ढकलण्यात आला होता. संघटनेतर्फे अध्यक्ष व आमदार किरण पावसकर यांनी व्यवस्थापनाशी बोलणी केली. कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त सेवेशी निगडीत खाद्यपदार्थ पुरवणारे व अन्य कर्मचारी मिळून २२ हजार रोजगार अडचणीत आले आहेत. या बाबत कामगार मंत्रालय काहीही करत नसल्याचा आरोप पावसकर यांनी केला. १० मेपर्यंत कामावर येण्याचे आवाहन पावसकर यांनी केल असता कामावर जाऊन करणार काय असा उलट सवाल उपस्थित कर्मचाऱ्यांनीच पावसकर यांना केला.



### सीबीआय चौकशीची मागणी

जेटचे प्रवासी अन्य कंपन्याकडे वळले असून त्यांनी विमान सेवांचे भाडे अव्वाच्या सवा वाढविले आहेत. हे पाहता हे कॉर्पोरेट षडयंत्र तर नाहीना असा प्रश्न पडतो. या सगळ्याची सीबीआय चौकशी करावी.

- किरण पावसकर

# 'जेट'च्या पुनर्वसनाचे आदेश देऊ शकत नाही!

## उच्च न्यायालयाचा हस्तक्षेपास नकार

**प्रतिनिधी, मुंबई**

**बुडत्या 'जेट** एअरवेज'ला संकटातून बाहेर काढण्याचे आणि त्याचे पुनर्वसन करण्याचे आदेश सरकार वा बँकांच्या संघटनेला देऊ शकत नाही, असे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने गुरुवारी या प्रकरणी हस्तक्षेप करण्यास नकार दिला.

आर्थिक संकटामुळे कंपनीने विमानसेवा बंद केलेली आहे. कंपनीला या संकटातून सावरण्यासाठी ४०० कोटी रुपयांची गरज आहे. मात्र बँकांनी ती देण्यास नकार दिलेला आहे. अ‍ॅड्. मॅथ्यू नेदुमपारा यांनी गुरुवारी 'जेट एअरवेज'ला या संकटातून बाहेर काढण्याचे आणि त्याचे पुनर्वसन करण्याचे आदेश सरकार तसेच बँकाच्या संघटनांना द्यावेत, अशी मागणी याचिकेद्वारे केली. त्याचप्रमाणे स्थिती लक्षात घेता त्यावर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली. कंपनीकडून अत्यावश्यक सेवा दिली जाते. ती कार्यान्वित राहावी यासाठी लागणारा खर्च उचलण्याचे आणि या संकटातून कंपनीला सावरण्याचे आदेश न्यायालयाने सरकार आणि बँकांच्या संघटनेला द्यावेत, अशी मागणीही नेदुमपारा यांनी केली. मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंदराजोग आणि न्यायमूर्ती नितीन जामदार यांच्या खंडपीठाने त्यांची ही मागणी मान्य केली जाऊ शकत नाही, असे स्पष्ट करत या प्रकरणी हस्तक्षेपास नकार दिला. त्याच वेळी आम्ही एक गोष्ट नक्की करू करू शकतो ती म्हणजे टोपी उपलब्ध झाली तर ती घेऊन त्याद्वारे निधी गोळा करू शकतो, असेही न्यायालयाने म्हटले.

# अग्निसुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या ठाण्यातील रुग्णालयांना टाळे ठोका! - न्यायालय

**प्रतिनिधी, मुंबई**

**ठाणे महानगरपालिका** क्षेत्रातील जी खासगी रुग्णालये आणि नर्सिंग होम अग्निसुरक्षा प्रमाणपत्राशिवाय कार्यान्वित आहेत, त्यांना टाळे ठोकण्याचे आदेश उच्च न्यायालयाने गुरुवारी पालिकेला दिले. न्यायालयाच्या या आदेशामुळे सध्या ७० खासगी रुग्णालये आणि नर्सिंग होमवर कारवाईचा बडगा उगारला जाण्याची शक्यता आहे.

पालिका व अग्निशमन दलाकडून बजावूनही संबंधित रुग्णालये-नर्सिंग होम अग्नि सुरक्षा प्रमाणपत्राबाबत गंभीर नसतील तर त्यांच्यावर टाळे ठोकण्याची कारवाई करायलाच हवी, असे परखड मतही मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंदराजोग आणि न्यायमूर्ती नितीन जामदार यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश देताना व्यक्त केले.

सपन श्रीवास्तव यांनी माहितीच्या अधिकाराअंतर्गत मिळालेल्या माहितीच्या आधारे अग्निसुरक्षा प्रमाणपत्राशिवाय कार्यान्वित असलेल्या खासगी रुग्णालये, नर्सिंग होमचा मुद्दा जनहित याचिकेद्वारे निदर्शनास आणला होता. जानेवारीत याचिका दाखल करण्यात आली, त्या वेळी ठाण्यातील ४५२ पैकी ४०५ रुग्णालये, नर्सिंग होमकडे अग्निसुरक्षा प्रमाणपत्र नसल्याचे सांगण्यात आले होते. ठाणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने केलेल्या पाहणीतही ५० टक्क्यांहून अधिक खासगी रुग्णालये-नर्सिंग होम प्रमाणपत्राशिवाय सुरू असल्याचे उघड झाले. पालिकेच्या वतीने अ‍ॅड्.अरविंद असवानी यांनी गुरुवारी प्रतिज्ञापत्र सादर केले. त्यानुसार, पालिकेच्या आरोग्य विभागाने ३७५ रुग्णालये-नर्सिंग होमच्या नोंदणीचे नूतनीकरण केले होते. त्यातील १८१ रुग्णालयांनाच अग्निसुरक्षा प्रमाणपत्र मिळाले. ७० खासगी रुग्णालये-नर्सिंग होम या प्रमाणपत्राशिवायच कार्यान्वित आहेत.

TATA

**TATA STEEL LIMITED**

Registered Office: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001, India
Tel.: +91 22 6665 8282 Fax No.: +91 22 6665 7724
Email: cosec@tatasteel.com Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

**सूचना**

टाटा स्टील लिमिटेड ("कंपनी") च्या संचालक मंडळाची सभा इतर बाबींसह खालील बाबीकरिता गुरुवार, २५ एप्रिल, २०१९ रोजी घेण्यात येणार आहे.

१. ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता लेखापरिक्षित अलिप्त आणि अलेखापरिक्षित एकत्रित वित्तीय विवरण आणि निष्कर्ष विचारात घेणे आणि अभिलिखित करण्यासाठी;
२. ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता लेखापरिक्षित अलिप्त आणि एकत्रित विवरण आणि निष्कर्ष विचारात घेणे आणि अभिलिखित करण्यासाठी; आणि
३. ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता काही असल्यास लाभांशाची शिफारस करणे.

वित्तीय निष्कर्ष कंपनीची वेबसाईट www.tatasteel.com तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाईट www.nseindia.com आणि बीएसई लिमिटेडची www.bseindia.com वर उपलब्ध करण्यात येतील.

**टाटा स्टील लिमिटेड**
सही/-
**पार्वथीसम के.**
कंपनी सेक्रेटरी आणि
चीफ लिगल ऑफिसर (कॉर्पोरेट आणि कॉम्प्लायन्स)

१७ एप्रिल, २०१९
मुंबई

**TATA STEEL**

N-1923




व्ही. पी. बेडेकर अ‍ॅण्ड सन्स प्रा. लिमिटेड
56, घारपुरे पथ, गिरगांव, व्ही. पी. बेडेकर मसालेवाले चौक, मुंबई - 4.
info@vpbedekar.com
bedekar.sales@gmail.com
www.vpbedekar.com

गरिबीवर वार
₹७२,०००
दरवर्षी प्रत्येक गरीब कुटुंबाच्या खात्यात



भारत स्वतंत्र झाला तेव्हा देशातील गरिबीचं प्रमाण ७०% होतं. काँग्रेस पक्षाच्या धोरणांमुळे हे प्रमाण आज २० टक्क्यांपर्यंत खाली आलं आहे.

NYAY योजना देशातील ५ कोटी कुटुंबांसाठी लाभदायक ठरणार आहे. दरवर्षी ७२,००० रूपयांचे अर्थसहाय्य कुटुंबातील महिलेच्या बँक खात्यात थेट जमा होणार आहे. या योजनेमुळे केवळ गरिबी निर्मूलन होणार नाही तर कोट्यवधी भारतीयांच्या हातात पैसाही खेळता राहणार आहे, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा कायापालट होईल.

गरीबी निर्मूलनातुनच आपल्याला न्याय मिळेल.

आता
होईल
न्याय
काँग्रेस

Published by All India Congress Committee, 24 Akbar Road, New Delhi-110011